# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १०.०९.२०२६ गुरूवार**

**तक्रार अर्जावरील केलेल्या चौकशीत हलगर्जीपणा व बेकायदेशीर वर्तनाबद्दल शिस्तभंगाची तसेच विभागीय चौकशीची कारवाई :-**

अर्जदार रवींद्र दिनकर इंगोले व इतर उमेदवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या परीक्षेत गुणांकनाच्या संदर्भातील गोपनीय दस्तऐवज उघड झाल्याबाबत तक्रार अर्ज दिनांक ०३.०१.२०२६ पोलीस उपआयुक्त, (गुन्हे शाखा) नागपूर शहर येथे दिला होता. सदरचा तक्रार अर्ज पुढील चौकशीकरीता गुन्हे शाखा, सामाजिक सुरक्षा विभागाचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. राहुल शिरे यांचेकडे देण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक राहुल शिरे यांनी सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने दिनांक ०३.०४.२०२६ रोजी अर्ज फाईल करण्याबाबत पोलीस उपआयुक्त, (गुन्हे शाखा) नागपूर शहर यांना अहवाल सादर केला. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, सदर प्रकरणात यापुर्वी कक्ष ०२, गुन्हे शाखा, नवी मुंबई येथील पोलीस निरिक्षक श्री. अनिल पाटील यांनी चौकशी केलेली आहे. पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांचेशी फोनवरून संपर्क करून त्यांनी फोनवर दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात चौकशी दरम्यान ज्वॉईंट कमीशनर व इतर एक्साईज विभाग असे दोषी असल्याबाबत त्यांनी अहवाल पाठविला होता. परंतु पोलीस निरीक्षक राहुल शिरे यांनी त्यांचे अहवालात चुकीने सहसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर असे नमुद केले होते.

सदर प्रकरणात मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, नागपुर शहर यांनी चौकशी दरम्यान श्री. राहुल शिरे व श्री. अनिल पाटील यांचेतील फोनवरील संभाषणाची ध्वनिफित पोनि. राहुल शिरे यांनी चौकशी अधिकारी यांचेसमोर सादर केली. त्या ध्वनिफितीतील संभाषणाची चौकशी अधिकारी यांनी पडताळणी केली असता, राहुल शिरे यांनी अहवालात सादर केलेल्या पोनि. पाटील यांच्याशी केलेल्या संभाषणातील सहसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा उल्लेखही दिसत नाही. त्यामुळे अहवालातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सहसचिव यांच्यावर दोष ठेवण्याची सदर माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी दिसते. ही चुकीची आणि खोटी माहिती पोनि. राहुल शिरे यांनी अहवालात कोणत्या उद्देशाने नमूद केली, या त्यांच्या बेकायदेशीर वर्तनाबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

**स्वा/-**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**